सकाळ

सांगली रविवार २९ डिसें.२०१३

# घटप्रभा फर्टिलायझर्सचा शेतकरी समृद्धीचा ध्यास

## सुरेश साळुंखे : शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन मार्गदर्शन

सकाळ वृत्तसेवा



सुरेश साळुंखे

सांगली, ता. २८ : व्यावसायिक पद्धतीने शेती करण्याचे धडे देत घटप्रभा फर्टिलायझर्सने शेतकऱ्यांना समृद्ध करण्याचा ध्यास घेतला आहे. कंपनीची विविध उत्पादने आणि तांत्रिक माहिती कृषी प्रदर्शनातील स्टॉलवर उपलब्ध होणार आहे, अशी माहिती मुख्य व्यवस्थापक (मार्केटिंग) सुरेश साळुंखे यांनी दिली.

ते म्हणाले, ''घटप्रभा फर्टिलायझर्स कंपनी महाराष्ट्र, कर्नाटकात खत निर्मितीत अग्रेसर आहे. कंपनीमार्फत रासायनिक, सेंद्रिय व जैविक खतांची निर्मिती केली जाते. योग्य प्रमाणात तीनही प्रकारच्या खत वापराने भरघोस उत्पादन घेणे व जमिनीचा सामू नियंत्रित ठेवणे शक्य आहे. 'भूमाता' या ब्रँडअंतर्गत खत निर्मिती केली जाते. भरघोस उत्पादन व मातीचा पीएच टिकविण्यासाठी 'भूमाता'च्या दर्जेदार खतांना शेतकऱ्यांची पसंती मिळते. 'भूमाता १८:१८:१०' हे एनपीके खत, 'भूमाता सह्याद्री सूक्ष्म अन्नद्रव्य,'भूमाता ऑल्ग्रो' हे उत्तम सेंद्रिय खत, 'भूमाता निम प्लस' उत्तम दर्जाची निंबोळी पावडर व 'भूमाता रिअल' दुय्यम अन्नघटक या उत्पादनाने शेतकऱ्यांना भरघोस उत्पादन शक्य झाले आहे.''

ते म्हणाले,''भूमाता सह्याद्रीचा पीक वाढ, उत्तेजन, फूलधारणा, दाणे भरणे, मुळावरील गाठी वाढविणे, हरितद्रव्य निर्मिती, स्फूरद, फेरसची उपलब्धता करण्यासाठी उपयोग होतो. 'भूमाता ऑल्ग्रो' हे उत्तम सेंद्रिय खत आहे. यासह 'भूमाता १८:१८:१०', 'भूमाता निम प्लस' व 'भूमाता रिअल' ही उत्पादने तितकीच लोकप्रिय आहेत. ओम शेठ गिल्डा, दीपक मालीवाल, मधुसुदन कलंत्री, शशिकांत पूरमवार यासह शिवा ग्रुपचे अन्य संचालक यांच्या मार्गदर्शनाखाली कंपनी शेतकऱ्यांच्या सेवेत आहे.''